वाचले :-

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०११ मधील सुधारीत तरतूदी.

२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि. ७ मे २०२१.

३. पदोन्नती समिती सभा दिनांक ०४/१०/२०२४ चा सभावृत्तांत.

४. मा.आयुक्तसो यांचा दिनांक- १०/१०/२०२४ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/०४/कावि/१४७५/२०२४
दिनांक: १०/१०/२०२४

**विषय :- ' कार्यालय अधिक्षक ' पदावरील पदोन्नतीबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवर **कार्यालय अधिक्षक** अभिनामाची पदे **पे लेवल एस-१५ वेतनश्रेणी र.रु.४१८०० – १३२३००** या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. त्यापैकी रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकामी दि.०४/१०/२०२४ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार **मुख्य लिपिक** या निकटतम निम्न पदावरील कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, शिस्तभंग आणि मत्ता व दायित्वाची माहिती, संगणक अर्हता इ. सेवाविषयक तपशील पडताळून शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ मधील मार्गदर्शक तरतुदींनुसार खालील कर्मचा-यांना मागासवर्गीयांचे पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात न्यायप्रविष्ट विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णयाच्या अधिन **कार्यालय अधिक्षक** अभिनामाच्या रिक्त पदांवर **पे लेवल एस-१५ वेतनश्रेणी र.रु.४१८०० – १३२३००** मध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत सर्वानुमते शिफारस केलेली आहे.

| अ.क्र | मुख्य लिपिक कर्मचा-यांचे नाव | प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापनेचा विभाग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | बोरे महादेव तुकाराम | ज्येष्ठतेनुसार | भूमि आणि जिंदगी |
| २. | गायकवाड मनिषा रविंद्र | दिव्यांग प्रवर्ग (ज्येष्ठतेनुसार) | थेरगाव रुग्णालय |
| ३. | जगताप राहुल कुंडलिक | ज्येष्ठतेनुसार | नगररचना |
| ४. | कुदळे जयश्री दिलीप | ज्येष्ठतेनुसार | करसंकलन |
| ५. | मोरे पांडुरंग सदाशिव | ज्येष्ठतेनुसार | विशेष नियोजन प्राधिकरण |
| ६. | गोरडे ज्ञानेश्वर धोंडीबा | ज्येष्ठतेनुसार | करसंकलन |
| ७. | कुंभार सुभाष गोडाजी | ज्येष्ठतेनुसार | क क्षेत्रीय कार्यालय |

| अ.क्र | मुख्य लिपिक कर्मचा-यांचे नाव | प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापनेचा विभाग |
|---|---|---|---|
| ८. | वांदल राजेश वापू | ज्येष्ठतेनुसार | करसंकलन |
| ९. | सातपुते आनंदा दत्तात्रय | ज्येष्ठतेनुसार | ग क्षेत्रीय कार्यालय |
| १०. | चिंचवडे अंबर किसनराव | ज्येष्ठतेनुसार | करसंकलन |
| ११. | वाविस्कर अनिता भिमराव | ज्येष्ठतेनुसार | समाज विकास |
| १२. | मरळीकर जयंत अण्णा | ज्येष्ठतेनुसार | अग्निशमन |
| १३. | सावरकर प्रमोद श्रीकृष्ण | ज्येष्ठतेनुसार | क्रिडा |
| १४. | यादव रमेश शंकरराव | ज्येष्ठतेनुसार | करसंकलन |
| १५. | मरळ सुधीर शिवाजी | ज्येष्ठतेनुसार | नगरसचिव |
| १६. | आभाणे विजय भिमाजी | ज्येष्ठतेनुसार | ड क्षेत्रीय कार्यालय |
| १७. | चेरेकर महादेव दत्तात्रय | ज्येष्ठतेनुसार | पाणीपुरवठा |

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व दि.७/०५/२०२१ चे शासन निर्णयास अधिन तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१, रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०९०९/२०२१ मध्ये होणा-या निर्णयाच्या अधिन राहून उपरोक्त नमूद कर्मचा-यांना **'कार्यालय अधिक्षक'** या पदावर **पे लेवल एस-१५ वेतनश्रेणी र.रु.४१८०० — १३२३००** या वेतनश्रेणीमध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ज्येष्ठतेनुसार आदेशाचे दिनांकापासून पदोन्नती देण्यास प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे. तसेच उपरोक्त पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचा-यांच्या नावासमोर स्तंभ क्र.४ मध्ये नमूद केलेल्या विभागामध्ये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र.साप्रवि/२/कावि/१९२/२०२३ दि.१८/०४/२०२३ अन्वये महानगरपालिका प्रशासकीय विभागातील अधिकारी / कर्मचारी यांच्या बदल्यांच्या अनुषंगाने कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्र लागू करण्यात आलेले आहे. सदरचे परिपत्रकाचे अनुषंगाने उपरोक्त नमूद कर्मचा-यांनी विहीत नमुन्यातील कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्र संबंधित विभागामध्ये १५ दिवसांत सादर करण्यात यावे.

उपरोक्त कर्मचारी सध्या ज्या विभागात काम करीत आहेत, त्या विभागाचे विभागप्रमुखांनी प्रस्तूत पदोन्नतीचे आदेश वरील कर्मचा-यांना तात्काळ बजवावेत व त्याबाबत त्यांचे दिनांकीत स्वाक्षरीची पोहोच प्रशासन विभागाकडे पाठवावी.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधित कर्मचा-यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**आयुक्त**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी ४११०१८**

प्रति, सर्व संबंधित कर्मचारी

प्रत-

१.  लेखा विभाग  २. लेखापरिक्षण विभाग  ३. प्रशासन टेबल क्रमांक  ७, ९, १०, १२, १४, संगणक कक्ष
४. पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघ ५. पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी सेवकांची सह.पतसंस्था
६. सर्व संबंधित विभाग---------------------

प्र. सहाय्यक आयुक्त (सा.प्र.वि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८